सिंधुदुर्ग, बुधवार, ११ मे २०२२ शहर-जिल्हा पुढारी ३



दोडामार्ग : डॉ. संजय खडपकर यांचे स्वागत करताना डॉ. दिवाकर मावळणकर. सोबत समीर ठाकूर व अन्य.

# दोडामार्ग तालुका रस्सीखेच संघटनेची स्थापना

**दोडामार्ग (पुढारी वृत्तसेवा) :** दोडामार्ग तालुका रस्सीखेच (टग ऑफ वॉर) संघटनेची नुकतीच स्थापना करण्यात आली. या संघटने अंतर्गत दोडामार्गात रस्सीखेच क्रीडा स्पर्धांचे लवकरच आयोजन करण्यात येणार आहे. सिद्धिविनायक मंदिरात या संघटना स्थापनेसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. संघटना स्थापनेच्या अनुषंगाने निरीक्षक म्हणून डॉ. दिवाकर मावळणकर उपस्थित होते. संघटनेचे जिल्हाध्यक्ष जयप्रकाश चमणकर (वेंगुर्ले) यांच्या मार्गदर्शनाखाली दोडामार्गात ही संघटना स्थापन करण्यात आली. या संघटनेची कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे. डॉ. संजय नारायण खडपकर (अध्यक्ष), समीर रोहिदास ठाकूर (उपाध्यक्ष), अंकुर आनंद म्हाडागुत (सचिव), यतेश श्रीकांत गोवेकर (खजिनदार), स्मिता सोमा गवस (सदस्य), तन्वी चंद्रकांत गवस (सदस्य), अश्विनी अरुण फाटक (सदस्य), विशांत तुळशीदास सावंत (सदस्य), सूरज चंद्रकांत गवस (सदस्य), साईराज अर्जुन राणे (सदस्य), विशाल उल्हास सावंत (सदस्य).